दिनांक २१/०५/२०१४ रोजी उपजिल्हा निवडणूक अधिकारी सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या मतदार नोंदणी संदर्भात झालेल्या सभेचा इतिवृत्तांत

---

उपस्थिती

१. श्री. विजयकुमार लिंबाजी काळे
महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटना ता. मोहोळ
२. श्री. शिवानंद वि. भरले
सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ
३. श्री. राजन रा. सावंत
जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती
४. श्री. श्रीशैल ऐवळे
महाराष्ट्र राज्य जि. प. मागासवर्गीय शिक्षक
५. श्री. रामचंद्र म. बिराजदार
सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख सभा
६. श्री. म. ज. मोरे
महाराष्ट्र राज्य सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ
७. प्रा. भालेराव बी. आर
अध्यक्ष सोलापूर जिल्हा मागासवर्गीय शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना सोलापूर
८. श्री. मोरे एस. एन.
अध्यक्ष महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी महासंघ
९. श्री. देवकर आर. डी.
सचिव महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी महासंघ
१०. श्री. नागटिळक सचिन
डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद
११. श्री. सुभाष बापूराव माने
अध्यक्ष महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळ मुंबई
१२. श्री. विश्रांत ना. गायकवाड
अध्यक्ष सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक संघ सोलापूर
१३. श्री. शंकर झुंबर वडणे
महाराष्ट्र राज्य शाळा कृती समिती सोलापूर
१४. श्री. प्रमोद मल्लिकार्जुन बत्तुल
महाराष्ट्र राज्य शाळा कृती समिती सोलापूर
१५. श्री. वाघमोडे देविदास माणिक
केंद्रप्रमुख व पदवीधर सभा शाखा अक्कलकोट

१६. श्री. शेख अमिरहमजा अ. रज्जाक
अखिल महाराष्ट्र उुर्दु शिक्षक संघटना सोलापूर

१७. श्री. प. द. किणगे
महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटना

१८. श्री. ग. बा. कांबळे
महाराष्ट्र राज्य ग्रेड मुख्याध्यापक संघ सोलापूर ( अक्कलकोट)

१९. श्री. आ. गु. कोरे
महाराष्ट्र राज्य पदवीधर व केंद्रप्रमुख सभा शाखा सोलापूर प्र. प्रमुख व के. प्र. करजगी

२०. श्री. होनमुटे व्ही.ए.
महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा कृति समिती संघटक

२१. श्री. रा. म. बिराजदार
महाराष्ट्र राज्य पदवीधर व केंद्र प्रमुख सभा सरचिटणीस

२२. श्री. सा. जा. गाडेकर
महाराष्ट्र राज्य पदवीधर केद्र प्रमुख सभा जिल्हा संघटक

२३. श्री. सिद्राम शंकर खट्टे
सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक संघ

२४. श्री. शहाजी विष्णु ठोंबरे
महाराष्ट्र राज्य शाळा कृती समिती

सभेच्या सुरवातीस मा. उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीचा हेतु विषद करुन मा. भारत निवडणूक आयोग, दिल्ली यांचेकडील पत्र क्र No.ECI/PN/2014 Date : 20/05/2014 अन्वये आगामी पदवीधर व शिक्षक निवडणूक 2014 या कार्यक्रमाचे वेळापत्रक मा. उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थित संघटनेच्या पदाधिका-याना पुढीलप्रमाणे वेळापत्रकाची माहिती दिली त्यात त्यांनी दिनांक 27/05/2014 रोजी नोटीफीकेशन, दिनांक 3 जुन 2014 अर्ज दाखल करणे, दिनांक 4 जुन 2014 रोजी छाननी, 6 जुन माघार घेणे, 20 जुन रोजी मतदान सकाळी 8 ते दुपारी 4 व दिनांक 24/06/2014 रोजी मतमोजणी सकाळी 8.00 वाजेपासुन सुरु असल्याची माहिती देखील दिली. दिनांक 20/05/2014 पासुन सदर निवडणूकीबाबत आचारसंहिता लागु झाल्याचे सांगीतले.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1950 मधील कलम 23 (3) नुसार पदवीधर / शिक्षक मतदार संघातील निवडणूकी संदर्भात नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतिम दिनांकापर्यत म्हणजेच 3 जून पर्यत मतदार नोंदणी प्रक्रिया चालू राहते. त्यामुळे शिक्षक / पदवीधर मतदारसंघातील मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी झाल्यानंतर देखील मतदार नोंदणी प्रक्रिया निरंतर पुनरिक्षणांतर्गत दिनांक 3/6/2014 पर्यत राहणार आहे. याबाबत सर्व संबंधितांना माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी दिली. शिक्षक मतदारसंघामध्ये सोलापूर जिल्हयामध्ये 7760 नावे जिल्हयाचे

वगळणी करणेत आलेचे मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी संबंधितांचे निदर्शनास आणले. यामधील बहुतांश नावे ही शिक्षकांना सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे त्याचे सेवेचा तपशिल दिलेला नसलेने वगळलेली आहेत. तरी सर्वांनी मतदार यादी सोलापूर जिल्हयाचे संकेत स्थळ www.solapur.nic.in. यावर किंवा तहसिल कार्यालयात तपासून घ्यावीत व जर पात्र मतदार वगळले असतील तर त्यांनी पून्हा फॉर्म 19 त्यांचे सेवेचे तपशिलसह भरुन घेऊन दिनांक 3 जून पूर्वी सादर केल्यास त्यांच्या नावाचा समावेश करता येईल असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी सांगीतले. तसेच सर्व 2008 चे यादीतील मतदार मुळ यादीत समाविष्ट असलेची खात्री करावी जर त्रुटी असतील तर त्या दूर केल्या जातील असे सांगीतले.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य शाळा कृति समिती सोलापूर चे अध्यक्ष शंकर झुंबर वडणे यांनी बार्शी तालुक्यातुन 1198 मतदार वगळणी असल्याबाबतची महत्वाची तक्रार मा. उपजिल्हाधिकारी यांचेकडे केली. यावर मा. उपजिल्हाधिकारी यांनी ही बाब गंभीर असुन एकही मतदाराचे नांव वगळले जाऊ नये याबाबत काळजी घेण्यात येईल याचे आश्वासन दिले. त्याबाबत संबंधित तहसिलदार यांचेकडे तक्रार देऊन त्याची पोहोच देण्याबाबत देखील मा. उपजिल्हाधिकारी यांनी संबंधितांना सांगीतले. यावर संबंधित तक्रारदाराने वगळण्यात आलेल्या मतदाराबाबत चौकशी करण्याची मागणी केली.

या सभेत मोठया प्रमाणात पदवीधर व शिक्षक मतदारांचे मतदार यादीत नांवे व त्यांचे फोटो यात मोठया चुका घोळ असल्याबाबत संघटनेच्या पदाधिका-यानी मा. उपजिल्हाधिकारी यांचेसमोर निर्दशनास आणुन दिले. त्याचबरोबर एका तहसिल मध्ये पदवीधर यादीतील नांवे शिक्षक मतदार यादीमध्ये समाविष्ट असल्याबाबत तक्रारी संघटनेच्या पदाधिका-यानी केल्या. यावर मा. उपजिल्हाधिकारी यांनी संबंधीत बाबी लेखी तक्रारी संबंधित सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे करुन कार्यालयास कळविणेबाबत सांगीतले. व सदर निवडणूकीबाबत सहकार्य करण्याबाबत विनंती देखील केली. शेवटी उपस्थितांचे आभार मानून सभा संपलेचे जाहिर करणेत आले.

सही/- XXX
( श्रीपती मोरे )
उपजिल्हा निवडणूक अधिकारी
सोलापूर

क्र.निवडणूक/कार्या/१६/आरआर/५०६/१४
दिनांक - २१.०५.२०१४

प्रत

-----------------------------------------

-----------------------------------------

यांना माहितीस्तव अग्रेषीत